# महाराष्ट्र शासन

नागरी स्वास्थ केंद्र, वांद्रे, (पूर्व),मुंबई- ४०००५१.
**URBAN HEALTH CENTRE, BANDRA (E),**
**Bandra Government Colony Campus, Near Mahatma Gandhi High School, Mumbai- 400 051.**
**Tel. No.: 6425611 / 6553317 / 6553318 / Fax No : 6553318**

क्रं.नास्वाकेंवांद्रे/सफाईगार/बाहयस्त्रोत/२३५६/२०१७. दिनांक १२/१२/२०१७

चतुर्थ श्रेणी सफाईगार पदांची कामे कंत्राटदारा मार्फत (आऊटसोर्सीग) करुन घेण्यासाठी

## जाहीर दरपत्रक

नागरी स्वास्थ केंद्र वांद्रे (पू) मुंबई -५१ यांचे आस्थापनेवर मंजुर करण्यात आलेल्या, सफाईगार, यांची कामे सहा महिने कालावधीकरीता शासनमान्य कंत्राटदाराकडून (आउटसोर्सीग) करुन घेण्यासाठी दिनांक १३/१२/२०१७ ते २०/१२/२०१७ या कालावधीत जाहीर दरपत्रके सिलबंद स्वरुपात मागविण्यात येत असून सदरील दरपत्रके नमुना सविस्तर तपशील, अटी, व शर्ती या अर्जासोबत जोडण्यात आलेले आहे. सदर दरपत्रकाचे फॉर्म (रु.७५०/- प्रत्येक फॉर्म) प्राध्यापक, नागरी स्वास्थ केंद्र वांद्रे (पू) मुंबई -५१ यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील.

तरी इच्छुक शासन मान्य कंत्राटदारांनी सदर दरपत्रक मधील अटी व शर्तीना बांधील राहून आपली दरपत्रक विहित नमुन्यात मोहोरबंद लखोटयात अगदी वरच्या भागावर मोठया अक्षरात **"सफाईगार पदासाठी दरपत्रक"** नाव लिहून प्राध्यापक यांचे कार्यालय, नागरी स्वास्थ केंद्र वांद्रे (पूर्व) मुंबई -५१ येथे दिनांक १३.१२.२०१७ ते २०.१२.२०१७ पर्यंत संध्याकाळी ५:०० वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहचतील अशा पध्दतीने पाठवाव्यात. तद्नंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. पोष्टाने/कुरियरने दरपत्रक फॉर्म विक्री करण्यांत येणार नाही. पोष्टाने/कुरियरने पाठविलेले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

सदर प्राप्त झालेली दरपत्रके या रुग्णालयाच्या संबधित समितीद्वारे दरपत्रक धारक अथवा त्यांचे प्रतिनिधिसमोर दि. २१. १२.२०१७ रोजी दुपारी ०२.३० वाजता उघडण्यात येतील व त्यातुन कमीत कमी रक्कमेची दरपत्रक संबधित समितीस योग्य वाटल्यास स्विकारण्यात येईल. याबाबतीत दरपत्रक स्विकृत करण्याचा अथवा रद्द करण्याचा अंतिम अधिकार प्राध्यापक यांचे कार्यालय, नागरी स्वास्थ केंद्र वांद्रे (पू) मुंबई -५१ यांचा राहील.

दिनांक १२/१२/२०१७.

डॉ.उषा रंगनाथन

प्राध्यापक
नागरी स्वास्थ केंद्र, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

# महाराष्ट्र शासन

नागरी स्वास्थ केंद्र, वांद्रे, (पूर्व),मुंबई- ४०००५१.

**URBAN HEALTH CENTRE, BANDRA (E),**

**Bandra Government Colony Campus, Near Mahatma Gandhi High School, Mumbai- 400 051.**

**Tel. No.: 6425611 / 6553317 / 6553318 / Fax No : 6553318**


---

क्रं.नास्वाकेंवांद्रे/सफाइगार/बाहयस्त्रोत/ /२०१७ दिनांक / /२०१७

चतुर्थ श्रेणी सफाइगार पदांची कामे कंत्राटदारामार्फत (आऊटसोर्सीग) करुन घेण्यासाठी

## जाहीर दरपत्रक

| अ.क्रं. | पदाचे नाव | आवश्यक संख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | सफाईगार | ०४ | नागरी स्वास्थ केंद्र वांद्रे रुग्णालयातील व रुग्णालयीन विभागातील साफ-सफाईची कामे झाडलोट तसेच रुग्णांच्या स्वच्छतेविषयक कामे करणे तसेच तद्अनुषंगाने इतर कामे करणे |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे:-**

१) कंत्राटदाराने कामासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले तर संबधित कंत्राटदारावर किमान वेतन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्याचे कंत्राट तात्काळ रद्द करुन त्याचे नाव काळया यादीतही टाकण्याची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) शासनमान्य कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना कामाचे वेतन व त्यानुषंगीक इतर सर्व भत्ते रोख स्वरुपात अदा न करता संबधित कंत्राटी कामगाराच्या नावाने रेखांकित धनादेशाद्वारेच (Account payee cross Cheque) अदा करावे.

३) कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना दिलेल्या धनादेशाची (चेकची) छांयाकित प्रत सदर धनादेश स्विकारल्याची कंत्राटी कामगाराची स्वाक्षरी असलेले वेतन देयक (ज्यावर सदर धनादेश क्रमांक लिहीलेला असेल) कंत्राटदाराने दरमहा या कार्यालयास सादर करावे. जो पर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे सादर करणार नाही तोपर्यंत त्या महीन्याचे कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

४) कंत्राटाचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत सहा महिन्यापेक्षा जास्त राहाणार नाही.

५) किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटदाराने कंत्राटी कामगारास भरपगारी साप्ताहीक सुट्टी देणे बंधनकारक असेल व अशा सुट्टीच्या दिवशी रुग्णालयास कंत्राटी कामगाराच्या सेवेची आवश्यकता भासल्यास,त्याचेऐवजी दुसरा कामगार उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

६) सुट्टीच्या दिवशी कंत्राटी कामगाराकडून काम करुन घेतल्यास त्या दिवसाची बदली रजा देण्यात यावी मात्र अशा बदली रजा देताना त्या दिवशी रुग्णालयातील कामकाजाचा खोळंबा होऊ नये म्हणून दुस-या कर्मचा-यांची सोय करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

७) कंत्राटराने नेमलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना रुग्णालयात हजर होतांना व रुग्णालय सोडतांना बायोमेट्रिक प्रणालीवर त्याची उपस्थिती नोंदविणे बंधनकारक असेल. सदर नोंदणीसाठी होणारा खर्च कंत्राटदाराने उचलावयाचा आहे.

८) कंत्राटदारास, त्याने नेमलेल्या कंत्राटी सफाईगार कामगार यांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनूसार वेतन, महागाई भत्ता, इतर भत्ते व सवलती लागु करणे बंधनकारक असेल.

९) ज्या कंपनीस / संस्थेस काम सोपविण्यात येईल यांनी त्याबाबच्या अटी व शर्ती नुसार करार करणे आवश्यक राहील.

१०) कंपनी / संस्थेतर्फे काम करणा-या कर्मचा-यांचे सेवेचे कोणतेही **उत्तरदायित्व शासनावर किंवा या रुग्णालयावर राहणार नाही.**

११) कंत्राटदारामार्फत दिल्या जाणा-या वरील सेवा /सुविधा इत्यादी बाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल व वेळोवेळी सुचविलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

१२) या रुग्णालयास कंत्राटी पध्दतीवर पुरविण्यात येणा-या सोईसुविधा/ कामे यांच्यासाठी जी कंत्राटी सेवा कंत्राटदारामार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने लागू असणारे सर्व कर कंत्राटदाराने अदा करावेत.

१३) उपरोक्त कामासाठी कंत्राटदारामार्फत ज्यांना काम देण्यात येणार आहे. त्यांना नियमित कर्मचा-यांप्रमाणे नियम अटी व शर्ती लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना नियमित कर्मचा-य्रांप्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगीक लाभ अनुज्ञेय / लागू राहणार नाहीत. त्यांच्या सेवा कालावधी किंवा कर्तव्य कालावधी व मानधनाबाबत. हे रुग्णालयीन प्रशासन व शासन जबाबदार राहणार नाही.

१४) शासनमान्य कंत्राटदारांनीच दरपत्रके सादर करावेत कंत्राटदारांना त्यांनी शासनाकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्राची सांक्षाक्षित छायाप्रत दरपत्रका सोबत सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे आयकर रिटर्न भरलेले बाबत मागील तीन वर्षाचा सांक्षाक्षित छायाप्रत, पॅन कार्ड, रहिवासी पत्ता इ. बाबतचे कागदपत्रांच्या सांक्षाकिंत छायाप्रती देखील दरपत्रिकेसोबत सादर करणे आवश्यक आहे. सदर कागदपत्राच्या छायाप्रतीसोबत त्यांच्या मूळ प्रती तपासणीसाठी सादर करणे कंत्राटदारावंर बंधनकारक आहे.

१५) कंत्राटदारांस (१) विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्रंमांक पदनि २५१२/प्र.क्र१५७/ का-१२/ मंत्रालय मुंबई दिनांक. २६.०२.१३ (२) विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्रंमांक पदनि २५१२/ प्रक्र. १५७/का-१२/मंत्रालय मुंबई दि. २७.०२.१३ व (३) विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्रंमाक पदनि २५१२/प्र.क्रं.१५७/का-१२/मंत्रालय, मुंबई दि. ०६/०३/१३ मधील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील त्याचप्रमाणे विधी न्याय विभाग तसेच नमुद करण्यात आलेल्या निर्देशांचे पालन करणे देखील बंधनकारक राहील.

१६) कंत्राटदाराने दरपत्रका सोबत आवश्यक ती फि/अनामत रक्कम शासकीय नियमाप्रमाणे कार्यालयात जमा करावी लागेल.

प्राध्यापक
नागरी स्वास्थ केंद्र, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

# महाराष्ट्र शासन

नागरी स्वास्थ केंद्र, वांद्रे, (पूर्व),मुंबई- ४०००५१.

**URBAN HEALTH CENTRE, BANDRA (E),**

**Bandra Government Colony Campus, Near Mahatma Gandhi High School, Mumbai- 400 051.**

**Tel. No.: 6425611 / 6553317 / 6553318 / Fax No : 6553318**


---

## दरपत्रकाचा नमुना

**दरपत्रक सुचना क्रमांक नास्वाकेवांद्रे/आस्था-४/सफाईगार/ /२०१७**

| | |
|---|---|
| दरपत्रके मागविणा-या कार्यालयाचे नाव | प्राध्यापक, नागरी स्वास्थ केंद्र वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ |
| कामाचे स्वरुप | नागरी स्वास्थ केंद्र वांद्रे रुग्णालयीन विभागातील व इमारतीच्या परिसराची साफ-सफाईची कामे झाडलोट तसेच रुग्णांच्या स्वच्छतेविषयक कामे करणे तसेच तद्अनुषंगाने इतर कामे करणे. |

| | |
|---|---|
| दरपत्रक क्रमांक | |
| कंत्राटदाराचे/संस्थेचे/कंपनीचे नाव | |
| कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता | |
| कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण दूरध्वनी | |
| कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता | |
| कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा नोंदणी क्रमाक | |
| कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा सेवा कर कर क्रमाक | |

## प्रपत्र

| अ. क्रं. | कामाचे स्वरुप | मागणी करण्यात आलेली कर्मचारी संख्या | मगणी केलेल्या पदासाठी कंत्राटी सेवा पुरविण्यासाठी कंत्राटदाराने मागणी केलेली एकूण रक्कम (सहामाही खर्च) | साधनसामुग्री खर्च असल्यास रुपये सहामाही खर्च) | सेवा कर (सहामाही खर्च) | एकूण रक्कम (रुपये) स्तंभ ४+५+६ | एकूण रक्कम (रुपये अक्षरी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | सफाईगार | ०४ | | | | | |
| | एकूण | | | | | | |

**दरपत्रक फॉर्मची प्रत्येकी रक्कम रुपये ७५०/- (अक्षरी.रुपये सातशे पन्नास फक्त)**

प्राध्यापक

नागरी स्वास्थ केंद्र, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१